आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१६ ऑगस्ट २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जम्मू काश्मीरमध्ये ३ टप्प्यात तर हरयाणात एका टप्प्यात विधानसभा निवडणूक, ४ ऑक्टोबरला मतमोजणी
- बांगलादेशातल्या हिंदू आणि सर्व अल्पसंख्यकांना संरक्षण देण्याची हंगामी सरकारचे मुख्य सल्लागार महम्मद युनूस यांची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना ग्वाही
- गगनयान मोहिमेतलं पहिलं मानवरहित यान या वर्षअखेरीपर्यंत प्रक्षेपित करण्याचं इस्रोचं नियोजन

**आणि**

- राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारात मल्याळम चित्रपट ‘आट्टम’ सर्वोत्कृष्ट, रिषभ शेट्टी, नित्या मेनन, मानसी पारेख सर्वोत्कृष्ट कलाकार

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं जम्मू काश्मीर आणि हरयाणा या दोन राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम आज जाहीर केला. जम्मू काश्मीरमध्ये १८ सप्टेंबर, २५ सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर २०२४ अशा तीन टप्प्यात मतदान होईल. जम्मूमध्ये ४३ आणि काश्मीरमध्ये ४७ असे एकूण ९० मतदारसंघ आहेत. काश्मिरी पंडित आणि पीओके मधील विस्थापितांसाठी नायब राज्यपालांकडून एकूण तीन जागांवर उमेदवार दिले जातील. त्यामुळे या राज्यात एकूण ९३ जागांसाठी मतदान होणार आहे.

हरयाणा विधानसभेच्या ९० जागांसाठी १ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. जम्मू-काश्मीर आणि हरयाणा या दोन्ही राज्यांची मतमोजणी ४ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

यापूर्वी हरयाणा आणि महाराष्ट्रातल्या विधानसभेच्या निवडणुका एकत्र घेण्यात आल्या होत्या. मात्र, महाराष्ट्रातली पावसाची स्थिती आणि सणांमुळे महाराष्ट्रातल्या निवडणुका हरयाणासोबत घेत नसल्याची माहिती राजीव कुमार यांनी या वार्ताहर परिषदेत दिली.

<><><><><>

युवकांनी नागरी सेवांच्या चक्रव्यूहातून बाहेर पडण्याची गरज असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आज राष्ट्रीय विधी विद्यालयाच्या पदव्युत्तर विभागात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. नागरी सेवा परीक्षांचं प्रशिक्षण देणाऱ्या खासगी शिकवणी वर्गांच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींना बळी पडू नये, त्यापेक्षा वेगळ्या वाटा चोखाळण्याचा प्रयत्न करावा असं ते म्हणाले.

<><><><><>

बांगला देशातल्या हिंदू आणि सर्व अल्पसंख्यकांना संरक्षण दिलं जाईल, अशी ग्वाही बांगला देशाच्या हंगामी सरकारचे मुख्य सल्लागार महम्मद युनूस यांनी दिली आहे. त्यांनी आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरुन संवाद साधला, आणि सद्य स्थितीबाबत चर्चा केली. आपापल्या राष्ट्रीय प्राधान्यांच्या अनुषंगानं उभयपक्षी संबंध पुढं नेण्याच्या मार्गांबाबत दोन्ही नेत्यांनी चर्चा केली. लोकशाहीवादी, स्थिर, शांततापूर्ण, आणि प्रागतिक बांगला देशासाठी भारताचा पाठिंबा कायम राहील, असं मोदी यांनी सांगितलं.

<><><><><>

इस्राएलच्या प्रधानमंत्री बेंजामीन नेतन्याहू यांनी आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरुन संवाद साधला, आणि पश्चिम आशियातल्या सद्य

स्थितीबाबत चर्चा केली. सध्याचा तणाव कमी करणं गरजेचं आहे, असं मोदी यांनी यावेळी सांगितलं. सर्व बंदीवानांची तात्काळ सुटका करण्याचं आवाहन त्यांनी केलं. संवाद आणि राजनितीक मार्गानं संघर्षावर लवकर आणि शांततापूर्व तोडगा काढण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

भारत-इस्राएल धोरणात्मक भागिदारी अधिक मजबूत करण्यासाठी तसंच उभयपक्षी सहकार्याच्या विविध बाजूंवर दोन्ही नेत्यांनी चर्चा केली.

**<><><><><>**

शेतकऱ्यांपर्यंत विज्ञान पोहोचवण्यासाठी सरकार आकाशवाणीवर **'किसानों की बात'** हा कार्यक्रम सुरू करणार आहे. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी नवी दिल्लीत शेतकऱ्यांशी संवाद साधताना ही माहिती दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमासारखा हा  कार्यक्रम असणार आहे. पुढच्या महिन्यापासून हा कार्यक्रम सुरू होईल. यात कृषी शास्त्रज्ञ आणि कृषी विभागाचे अधिकारी शेतकऱ्यांना माहिती देणार असल्याचं,  त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

प्रसारभारती आणि संसद टीव्ही यांच्यात आज एक सामंजस्य करार झाला. प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी आणि आणि संसद टीव्हीचे मुख्य कार्यकारी अधिकारी रजित पुन्हानी यावेळी उपस्थित होते. संसाधनांची देवाण-घेवाण कर्मचाऱ्यांचं प्रशिक्षण आणि एकमेकांच्या कार्यक्रमांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी हा करार उपयुक्त ठरेल.

कार्यक्रमांची देवाण-घेवाण, प्रसारभारतीच्या ओटीटी मंचांवर संसद टीव्हीचं प्रसारण तसंच प्रशिक्षण सुविधांचा उपयोग करणं, हा या कराराचा उद्देश असल्याचं द्विवेदी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

गगनयान मोहिमेतलं पहिलं मानवरहित यान या वर्षअखेरीपर्यंत प्रक्षेपित करण्याचं इस्त्रोचं नियोजन आहे. इस्त्रोचे अध्यक्ष सोमनाथ यांनी आज बातमीदारांना ही माहिती दिली. रॉकेटचे सर्व भाग सतीश धवन अंतराळ केंद्रात पोहोचले आहेत आणि तिथं ते एकत्र करुन अभियान राबवलं जाईल, असं त्यांनी सांगितलं.

इस्त्रो, अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं पृथ्वी निरीक्षण उपग्रह आणि एस आर ओ- डेमो सॅट प्रवासी उपग्रह आज सकाळी श्रीहरीकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून यशस्वीरित्या प्रक्षेपित केल्याची माहिती, इस्त्रोचे अध्यक्ष सोमनाथ यांनी दिली. एसएसएलव्हीचं हे तिसरं प्रक्षेपण आहे. याबरोबरच भारत, सूक्ष्म, लहान आणि नॅनो उपग्रह पाठवायला सक्षम असल्याचं सिद्ध झालं आहे, असंही ते म्हणाले. पाळत ठेवणं, आपत्ती निरीक्षण, आग शोधणं, ज्वालामुखीची, महासागराच्या पृष्ठभागावरील वारे, मातीतील ओलावा, आदी घडामोडींची आगाऊ माहिती या उपग्रहाद्वारे दिली जाईल.

या यशस्वी प्रक्षेपणासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इस्त्रोच्या शास्त्रज्ञांचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

डॉक्टर महिलेवर अत्याचार आणि हत्येप्रकरणी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आज मोर्चात सहभाग नोंदवला. या प्रकरणाची सुनावणी जलद व्हावी आणि तिला

न्याय मिळावा यासाठी हा मोर्चा काढला होता. परवा रात्री रुग्णालयात झालेल्या तोडफोडीला भाजपा आणि डावे जबाबदार असल्याचा आरोप मुख्यमंत्र्यांनी केला. याप्रकरणी कोलकता पोलिसांनी २५ जणांना अटक केला आहे. या प्रकरणावरुन भाजपा समर्थक आणि पोलिसांमध्ये आज कोलकात्यात संघर्ष झाला. दरम्यान याप्रकरणी सीबीआयच्या पथकानं रुग्णालाच्या अधिकाऱ्यांची चौकशी केली.

**<><><><><>**

मणिपूरमधे कांगपोकपी जिल्ह्यात आसाम रायफल्स आणि मणिपूर पोलिसांच्या संयुक्त पथकानं एक शोधमोहिम राबवून काही शस्त्रास्त्रं आणि दारुगोळा जप्त केला. लॉयचिंग रिज भागात काही समाजकंटकांनी हा दारुगोळा लपवला असल्याची माहिती मिळाल्यानंतर या संयुक्त पथकानं ही शोधमोहिम राबवली.

**<><><><><>**

शाश्वत भविष्यासाठी सक्षम दक्षिण गोलार्ध, या विषयावर उद्या भारतात दूरदृष्य प्रणालिच्या माध्यमातून व्हॉइस ऑफ ग्लोबल साऊथ या परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी आज ही माहिती दिली. या परिषदेत देशांमधला संघर्ष, अन्न आणि ऊर्जा सुरक्षा संकटं आणि हवामान बदल यांसारख्या जगावर परिणाम करत असलेल्या जटिल प्रश्नांवर प्रामुख्यानं चर्चा केली जाणार आहे. तसंच विकासाच्या क्षेत्रात आव्हानं, प्राधान्यक्रम आणि उपाय यावरही चर्चेचा भर असणार असल्याचं जयस्वाल यांनी सांगितलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या परिषदेचं उद्घाटन करतील. येत्या २० तारखेला जपान आणि भारतादरम्यान द्वीपक्षीय चर्चा केली जाणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

७०व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार ‘आट्टम’ या मल्याळम चित्रपटाला जाहीर झाला. ‘ऊँचाई’ या चित्रपटासाठी सूरज बडजात्या यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार जाहीर झाला. ‘तिरुचित्रमबलम’ या चित्रपटासाठी नित्या मेनन आणि ‘कच्छ एक्सप्रेस’ या चित्रपटासाठी मानसी पारेख सर्वोत्कृष्ट नायिका ठरल्या. ‘कांतारा’ या कन्नड चित्रपटासाठी रिषभ शेट्टी याला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार जाहीर झाला.

सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शनाचा पुरस्कार ‘पोन्नियन सेल्वन भाग १’ या तमिळ चित्रपटासाठी ए. आर. रेहमान, आणि ‘ब्रह्मास्त्र- भाग १ः शिवा’ या हिंदी चित्रपटासाठी प्रीतम, यांना विभागून देण्यात आला. तर सर्वोत्कृष्ट पार्श्वगायकाचा मान ‘केसरिया’ या गाण्यासाठी अरिजीत सिंह यानं पटकावला. मल्याळम भाषेतल्या ‘सौदी वेल्लक्का सीसी २२५ बाय २००९’ या चित्रपटातल्या ‘चायुम वेयिल’ या गीतासाठी सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिकेचा पुरस्कार बॉम्बे जयश्री यांना जाहीर झाला.

सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा पुरस्कार ‘वाळवी’ या चित्रपटाला जाहीर झाला आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं आज या पुरस्कारांची घोषणा केली. नॉन फीचर विभागात सोहिल वैद्य दिग्दर्शित ‘आदीगुंजन’ या मराठी माहितीपटानं सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा मान मिळवला. याच माहितीपटासाठी सुमंत शिंदे यांना सर्वोत्कृष्ट निवेदनासाठी पुरस्कार जाहीर झाला.

सर्वोत्कृष्ट कला/संस्कृतीविषयक चित्रपटाचा मान सचिन सूर्यवंशी यांच्या ‘वारसा’ या मराठी चित्रपटानं पटकावला. तर अशोक राणे दिग्दर्शित ‘आणखी एक मोहेंजोदारो’ हा सर्वोत्कृष्ट चरित्र अथवा ऐतिहासिक चित्रपट ठरला.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रीमंडळानं आज ठाणे मेट्रोला परवानगी दिली. केंद्रीय माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली. ठाण्यात ही रिंग मेट्रो असणार आहे. यासह आणखी ३ मेट्रोला मंत्रीमंडळानं मंजुरी दिली.

**<><><><><>**

पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ च्या उद्घाटन समारंभासाठी भारताचे ध्वजवाहक म्हणून भाग्यश्री जाधव आणि सुमित अंतिल यांची निवड करण्यात आली आहे. या पॅरालिम्पिकमध्ये ८४ भारतीय खेळाडू भारताचं प्रतिनिधीत्व करणार आहेत. ही आतापर्यंतची सर्वात मोठी संख्या असल्याचं केंद्रीय क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविय यांनी म्हटलं आहे. या पॅरालिम्पिक स्पर्धा २८ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या दरम्यान होणार आहेत.

**//<><><><><>//**